संदर्भ :—१. जिल्हा व सत्र न्यायालय, जळगावं कडिल दि. ०७.०७.२०२५ रोजीची मंजुर कार्यालयीन टिपणी
२. जिल्हा व सत्र न्यायालय, जळगावं कडिल दि. ११.०७.२०२५ रोजीची मंजुर कार्यालयीन टिपणी

दि.18 / 07 / 2025

जिल्हा व सत्र न्यायालय – जळगांव.
जाहीर निविदा.

जळगांव जिल्हयातील तमाम कार्यालयीन उपयोगाचे संगणक व यु. पी.एस. पुरविणा–या पुरवठाकारांना या जाहीर निविदेद्वारे कळविण्यांत येते की, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव न्यायालयांसाठी लागणारे संगणकाकरीता यु.पी.एस. व इतर संगणक साहित्य खालील प्रमाणे खरेदी करावयाचे आहे तरी याकामी ज्या पुरवठाकारांना स्वारस्य असेल त्यांनी त्यांची दरपत्रके बंद लिफाफ्यात मा.प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव या नावाने पाकिटावर ''यु.पी.एस. व संगणकीय साहित्य'' असे नमुद करुन पाकीटे प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कक्ष कमांक 101 मध्ये दिनांक 28 / 07 / 2025 पर्यत कार्यालयीन वेळेत व कार्यालयीन दिवशी सादर करावीत अथवा समक्ष आणून दयावीत. त्यानंतर प्राप्त झालेल्या दरपत्रकाचा विचार केला जाणार नाही. दरपत्रके दिनांक 29 / 07 / 2025 रोजी मा. जिल्हा व सत्र न्यायाधीश. 1, जळगांव यांचे निजी कक्षात उघडले जातील.

कार्यालयीन उपयोगाकरीता लागणारे यु.पी.एस. व संगणकीय साहित्य खालील प्रमाणे उधारीवर खरेदी करावयाची आहेत.

अ.क्र.	साहित्य	आवश्यक संख्या
1	**UPS (Champion 3 KVA 120 min Backup) with 12v-100Ah 6 Batteries**	**02**
2	**HDMI Splitter 1+4**	**20**
3	**HDMI Cable 1.5 Mtr**	**20**
4	**USB Keyboard + Mouse**	**30**
5	**HDMI to VGA Convertor**	**10**
6	**UPS Battery 600VA**	**25**

....2

सर्वसाधारण अटी.

1 दरपत्रक स्विकृत केल्यावर आदेश दिल्यानंतर सदरचे साहित्य त्वरीत पुरवावे. सदरील साहित्याचा दर्जा उत्कृष्ट आणि उच्च प्रतीचा Genuine (Original) असावा नसल्यास स्विकाराला जाणार नाही.

2 सदरचे साहित्य कार्यालयीन वेळेत कार्यालयात स्वखर्चाने पोहोचवून दिले पाहिजे.

3. दरपत्रके स्विकारण्याचा अथवा नाकारणेचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांच्याकडेस राखून ठेवण्यांत आलेला आहे. दरपत्रक भरतांना दर अंकात व अक्षरी असे दोन्ही प्रकारे भरावेत.

4. सदरील साहित्य जिल्हा व सत्र न्यायालय, जळगांव कार्यालयात पोहोचवून दिलेवर उधारीचे देयक तीन प्रतीत सादर करावे.

5. दरपत्रक भरतांना सर्व करांसह दरपत्रक भरावे. मात्र जीएसटी टॅक्सचा स्वतंत्र दर नमुद करावा. त्याचवेळी महाराष्ट्र शासनास पुरवठा केल्यास तरतुदीप्रमाणे सुट दिली जाते त्या अटीस आधीन राहून दरपत्रक दयावे लागेल, तसेच बिलाची रक्कम अदा करतांना नियमानुसार टी.डी.एस. कपात करण्यात येईल.

6. उपरोक्त साहित्य अनुदानाअभावी कमी–जास्त प्रमाणात खरेदी करण्याचे अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांच्या कडेस राखून ठेवण्यात आलेले आहेत. तसेच उपरोक्त वस्तु उधारीवर खरेदी करावयाचे आहेत. तसेच सदर बीलाची रक्कम अनुदान उपलब्धतेनुसार देण्यात येईल.

7. दरपत्रक उघडण्याच्या दिवशी व नमुद वेळी दरपत्रक पाठविणा–यांनी प्रत्यक्ष हजर रहावे अथवा प्रतिनिधी पाठवावा अन्यथा त्यांच्या गैरहजेरीत दरपत्रक उघडणेत येतील.

8. दरपत्रकातील दर दिनांक 31.12.2025 अखेर कार्यरत राहतील. अगर त्यानंतरही त्याच दरात पुरविली जातील त्या कालावधीचा खुलासा स्पष्ट करावा.

9. नमुद वस्तूंचा पुरवठा आदेश देवूनही मुदतीत न केल्यास पुरवठा आदेश रद्द करण्याचा अधिकार मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, जळगांव यांनी राखून ठेवला आहे.

V.V. Kamkar

प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय,
जळगांव.

म.जा.क./ ३९८ /2025
जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव
दिनांक. 18/07/2025.

प्रत माहिती करीता व नोटीस बोर्डावर प्रसिध्दी करीता.

1. म.जिल्हाधिकारी,जळगांव.
2. म.तहसिलदार,जळगांव.
3. म.दिवाणी न्यायाधिश व.स्तर,जळगांव.
4. जिल्हा व सत्र न्यायालय,जळगांव.
5. मुख्य न्यायदंडाधिकारी,जळगांव.
6. जिल्हा व सत्र न्यायालयाच्या संकेतस्थळावर.